# मिरा-भाईंदर ,वसई-विरार पोलीस आयुक्तालय
## सायबर गुन्हे कक्ष
३ रा मजला, पोलीस उप-आयुक्त (गुन्हे), यांचे कार्यालय,
ओत्सवाल हाईट्सचे समोर, कनाकिया रोड, मिरारोड पुर्व, ता.जि.ठाणे
फोन नंबर – ०२२-२८११ ०१३५, व्हॉट्सॲप हेल्पलाईन क्र. ९०० ४८८ ०१३५
**Email ID – cybercrime.mb-vv@mahapolice.gov.in**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेस नोट :-११३/२०२२ दिनांक – २५/०४/२०२२

# Whats app फसवणुकीबाबत घ्यावयाची काळजी....

व्हॉट्सॲप हे सर्वाधिक वापरल जाणार इन्स्टंट मेसेजिंग ॲप असुन ते वापरास सोप्पे (युझर फ्रेंडली) आहे. व्हॉट्सॲप आपल्या युजर्सच्या सुरक्षिततेसाठी नवे अपडेट, सिक्युरीटी फिचर्स अथवा सुविधा देत असतात. काही दिवसांपुर्वी व्हॉट्सॲपने पेमेंट फिचर्स सुरु करण्यात आलेले आहे. त्यामध्ये वापरकर्त्याला QR Code Scan करावा लागतो. रक्कम प्रविष्ट करावी लागते आणि पैसे हस्तांतरीत केले जातात.

मात्र ही प्रक्रीया सुलभ झाल्याने फसवणुक करणाऱ्यांनी त्याला लक्ष करण्यास सुरवात केली आहे. काही स्कॅमर गुन्हे करण्यासाठी QR Code प्रणाली वापरत आहे. आणि ते तुम्हाला फसवू शकतात.

**"डोळयावर विश्वास बसणार नाही इतक भारी असेल तर लक्षात ठेवा.. स्कॅम आहे."**

**(Some Scammers are defrauding people through the WhatsApp Pay QR Code System)**

**फसवणुकीचा प्रकार :-** तुम्ही एखादी वस्तू विकल्यास, फसवणूक करणारे तुमचे उत्पादन खरेदी करण्याचे नाटक करतात. यानंतर ते व्हॉट्सॲपवर QR Code शेअर करतात. ते तुम्हाला Google Pay अथवा इतर UPI आधारीत एप्लिकेशनद्वारे स्कॅन करण्यास सांगतात. जेणेकरून तुमच्या बँक खात्यात जमा करता येतील. फसवणूक करणाऱ्याची आज्ञा पाळल्याने तुम्हाला पैसे मिळण्याऐवजी बँक खाते रिकामे होते. वास्तविक तुम्ही QR Code स्कॅन करताच, तो तुम्हाला MPIN मागेल आणि तुमच्या खात्यातून पैसे कापले जातील.

**घ्यावयाची काळजी...**

- ज्यांना ऑनलाईन पेमेंटचे फारसे ज्ञान नाही, त्यांनी त्याबद्दल माहीती घेणे किंवा रोख्रीने व्यवहार करणे केव्हाही चांगले.
- जेव्हा तुम्हाला एखादयाला पेमेंट करण्याची आवश्यकता असेल, तेव्हा तुम्ही नेहमी Whatapp वर QR कोड स्कॅन केल्यानंतर नाव किंवा UPI आयडी दोनदा तपासा आणि नंतर पेमेंट करा.
- नेहमी लक्षात ठेवा की पैसे अकाऊंटवर येण्यासाठी MPIN कधीही प्रविष्ट करावा लागत नाही. जेव्हा तुमच्या बाजूने पैसे म्हणजेच तुम्ही पैसे पाठवणार असाल तेव्हाच तो प्रविष्ट करावा लागतो.

तरी मिरा,भाईंदर-वसई,विरार पोलीस आयुक्तालयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, अशा प्रकारे कोणत्याही इसमाची फसवणूक झाल्यास तात्काळ नजीकच्या पोलीस ठाणेस, सायबर गुन्हे कक्षास संपर्क साधावा. तसेच www.cybercrime.gov.in अथवा 1930 या हेल्पलाईनवर संपर्क साधून तक्रार द्यावी.

-----oooo----